कोविड-१९ या साथीच्या रोगाकरीता आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी विषयक मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्र.आयुसे-०५२०/प्र.क्र.३३/आयु-१
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
९ वा मजला,लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००१३
दिनांक :- ३० सप्टेंबर, २०२०

वाचा -:
१) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.वैशिवि-२०२० /प्र.क्र.८१/२०/वैसेवा-३, दि.१३.०५.२०२०
२) शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.आयुसे-०५२० /प्र.क्र.३३/आयु-१, दि.२३.०६.२०२०
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं/ कोविड-१९ / आयुष/मार्गदर्शक सूचना/४-अ/२०२०, दि.२४.०८.२०२०

प्रस्तावना :-

कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर शासनास तसेच राज्यातील आरोग्य यंत्रणेतील जबाबदार अधिकाऱ्यांना आयुर्वेद/होमिओपॅथी/युनानी/योग चिकित्सा पध्दतीच्या अवलंबाबाबत सूचना/सल्ला देण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये "टास्क फोर्स ऑन आयुष फोर कोविड-१९" गठीत करण्यात आला आहे. सदर समितीच्या संपन्न झालेल्या बैठकीत कोविड-१९ या साथीच्या रोगाकरीता आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी विषयक मार्गदर्शक सूचना भाग-२ तयार करण्यात आल्या. या सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावरुन आदेश पारीत होण्याच्या दृष्टीने संदर्भ क्र.३ अन्वये याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय :-

"टास्क फोर्स ऑन आयुष फोर कोविड-१९" या समितीने कोविड-१९ या संसर्गजन्य आजारावरील उपचारासाठी संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये सादर केलेल्या खालील मार्गदर्शक सूचना भाग-२ च्या अंमलबजावणीस शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.